
California

**प्रेसनोट दिनांक 03/06/2026**

**जामनेर पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक 314/2026 भारतीय न्याय संहिता कलम 305(A),331(3), 331(4),3(5) मधील आरोपी अटक करुन मुद्देमाल जप्त केले बाबत..**

दिनांक 25/06/2026 रोजी रात्री 08.00 वा ते दि.29/06/2026 रोजी सकाळी 07.15 वा चे सुमारास फिर्यादी मसुद अक्तर मुजफर हुसेन, वय ५० वर्षे, व्यवसाय मौ ईमाम, रा मदनी नगर, प्लॉट नन ४२, जामनेर ता. जामनेर, जि. जळगाव हे कामानिमत्त बाहेर गेले असतांना कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचा कडी कोयंडा तोडुन घरामध्ये प्रवेश करुन घरातील कपाटामध्ये ठेवलेले एकुन 9,23,000/- रु कि.चे. 30.1 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व 12 भार वजणाचे चांदीचे दागीने व 4,00,000/- रु रोख रक्कम चोरी करुन घेवुन गेला म्हणुन अज्ञात आरोपी यांचे विरुध्द जामनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि क्रमांक 314/2026 भारतीय न्याय संहिता कलम 305(A),331(3), 331(4),3(5) प्रमाणे दिनांक दिनांक 29/06/2026 रोजी दुपारी 13.59 वा रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

मिळाले बातमीप्रमाणे जामनेर पोलीस स्टेशन रेकॉडवरील आरोपी यास स्थानिक नागरीक यांनी दिनांक 28/06/2026 रोजी सदर भागात त्याचे साथिदार यांचे सह भिरतांना पाहीले होते. यावरुन रेकॉडवरील आरोपी शेख समिर उर्फ बाल्या शेख जाकीर, वय 24 वर्षे, रा. बी.एस.एन.एल. टॉवर,मदनीनगर जामनेर जि.जळगाव यास ताब्यात घेण्यात आले. आरोपी शेख समिर उर्फ बाल्या शेख जाकीर याने सदरची घरफोडी ही त्याचे साथिदार मोहमंद फातिर ऊर्फ गोलु मिया तुफेल मोहंमद, वय 20 वषे, रा. मदनीगर जामनेर, जि.जळगाव.3) शेख अमिर शेख जाकीर, वय 19 वर्षे, रा. बी एस एन एल टॉवर,जामनेर,जळगाव यांचे मदतीने केली असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाल्याने आरोपी 1) मोहंमद फातिर ऊर्फ गोलु मिया तुफेल मोहंमद यास जामनेर येथुन व आरोपी शेख अमिर शेख जाकीर यास नाशिक येथुन ताब्यात घेण्यात आले.तपासमध्ये आरोपी यांचेकडुन एकुन चोरीस गेले मालापैकी 30.01 ग्रॅम वजनाचे सोने, 12 भार चांदी एकुन रक्कम 5,23,000 हजार व रोख रक्कम 71,500 हजार रुपये, 30,000 हजार रुपये किमतीचे 3 मोबाईल असे एकुन- 6,24,500 रुपये किमतीचा मुद्देमाल हा जप्त करण्यात आला.

सदची कारवाई ही मा.श्रीकांत धिवरे, पोलीस अधिक्षक जळगाव, मा.अशोक नखाते, अपर पोलीस आयुक्त, चाळीसगाव, मा.बापु रोहम, उप विभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा, विभाग पाचोरा, मा. मुरलिधर कासार, पोलीस निरीक्षक सो, जामनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक अशोक कोकाटे, पोलीस शिपाई ब.नं. 2103 सचिन महाजन, पोलीस शिपाई ब.नं. 739 ज्ञानेश्वर देशमुख, पोलीस शिपाई ब.नं.288 सुशिल सत्रे जामनेर पोलीस स्टेशन यांनी केली आहे.

प्रेसनोट

जामनेर पोलीस स्टेशन गुरन-310/2026,भा.न्या.सं.कलम-305(a),331(3),प्रमाणे दि.24/06/2026 रोजी दुपारी 12.00वा.चे सुमारास घडलेला असुन दि. 24/06/2026 रोजी 21.59 वा.दाखल आहे. सदर गुन्ह्यात आरोपी मजकुर यांनी फिर्यादीच्या घरातुन 70,000/-रुपये रोख चोरुन नेलेले होते.ते आरोपी मजकुर 1)आरीफखान लालखान कंजर, वय-25वर्ष, रा.सोनारी, ता.जामनेर, जि.जळगाव 2) मुबारीक अली खान,वय-20वर्षे, रा.केरपाणी, ता.नेपानगर, जि. बु-हाणपुर,(मध्य प्रदेश) यांना अटक करुन त्यांच्याकडुन चोरीस गेलेली रोख रक्कम 70,000/-हस्तगत करुन गुन्ह्यात वापरलेली नंबर प्लेट नसलेली काळ्या रंगाची स्पेलंडर मोटार सायकल हस्तगत केलेली आहे.सदर आरोपीतांना अटक करतेवेळी पोहेकॉ/2840 संजय खंडारे (तपासी अंमलदार),पोहेकॉ/1298 राजु तायडे,पोकॉ/2103 सचिन महाजन,पोकॉ/2839 उज्वल जाधव यांनी मदत केलेली आहे.